


दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०६ | अंक : ५८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.११ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# महाराष्ट्राच्या वातावरणात बदल! उष्णतेची लाट येणार !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** राज्यातून परतीच्या मान्सूनची माघार झाल्यानंतर बहुतांश भागांत पावसाने उघडीप दिली असून, तापमानात वाढ होत आहे. राज्यात सध्या उष्ण, दमट आणि ढगाळ हवामान दिसत आहे. काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरींची शक्यता असली, तरी राज्यभर जोरदार पावसाचे संकेत नाहीत. अशा परिस्थितीत आज शनिवारी रोजी कोकणापासून विदर्भापर्यंत हवामान कसं राहणार? याबाबत हवामान विभागाने महत्त्वाची माहिती दिली आहे.



**'या' जिल्ह्यांना यलो अलर्ट**

कोकण विभागात पुन्हा एकदा तापमानात वाढ होताना दिसत आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत यलो अलर्ट असून उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरींची शक्यता आहे. या भागात कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २३ ते २४ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे.

**उत्तर महाराष्ट्रात नागरिकांच्या अंगाची लाहीलाही...**

उत्तर महाराष्ट्रातही दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत कोणताही विशेष हवामान अलर्ट नसून, प्रामुख्याने हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. पुढील चार ते पाच दिवसही अशाच प्रकारचे हवामान राहण्याचा अंदाज आहे. या भागात कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २० अंश सेल्सिअसच्या आसपास राहू शकते. विशेष म्हणजे, उत्तर महाराष्ट्रात नागरिकांची उन्हामुळे लाहीलाही होत आहे.

पश्चिम महाराष्ट्रात काय स्थिती?

पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांत प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. दुसरीकडे, कोल्हापूर, सातारा आणि सांगलीच्या काही भागांसह घाटमाथ्यावर हलक्या सरी आणि मेघगर्जनेची शक्यता आहे. मात्र, सर्वदूर पाऊस पडण्याची चिन्हे नाहीत. या विभागात कमाल तापमान ३२ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे.

**विदर्भातही पावसाची उघडीप**

विदर्भातही मागील अनेक दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. विशेष हवामान अलर्ट नसून, बहुतांश भागांत उष्ण आणि कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहू शकते. राज्यातील हवामानाचा आढावा घेतल्यास कोकणात उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा असून, सिंधुदुर्ग तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत हलक्या सरींची शक्यता आहे.

मात्र, उर्वरित राज्यात प्रामुख्याने कोरडे आणि उष्ण हवामान राहण्याचा अंदाज आहे. परतीच्या मान्सूननंतर पावसाची उघडीप आणि वाढते तापमान यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडत आहे. नागरिकांनी उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

---

## वाशीगावात अनधिकृत ३०५ झोपड्यांवर महापालिकेची तोडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने वाशीगाव परिसरातील सेक्टर-३० येथील केरला भवनसमोरील भूखंडावर उभारण्यात आलेल्या अनधिकृत झोपड्यांवर धडक तोडक कारवाई करण्यात आली. उच्चदाब विद्युत वाहिन्यांखालील तसेच नवी मुंबई महानगरपालिका आणि सिडकोच्या जागेवर वसलेल्या या झोपड्यांवर ८ आणि ९ ऑक्टोबर रोजी ही मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत दोन दिवसांत एकूण ३०५ अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या.



८ ऑक्टोबर रोजी १४५, तर ९ ऑक्टोबर रोजी १६० झोपड्या हटविण्यात आल्या. या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस, अतिक्रमण पोलीस, सुरक्षा रक्षक आणि मजूर सहभागी झाले होते. एका जेसीबीच्या साहाय्याने ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

---

## बांधकामांतील प्रदूषण रोखण्यासाठी नवी मुंबई महापालिका आक्रमक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** हिवाळ्यात हवेची गुणवत्ता ढासळू नये आणि बांधकामांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने कडक पावले उचलली आहेत. बांधकाम स्थळांवर प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध काम थांबविणे, जागा सील करणे आणि आर्थिक दंडाची कारवाई करण्यात येणार आहे. यासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी बांधकाम विकासक, वास्तुविशारद, सर्वेक्षक आणि कंत्राटदारांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संबंधित घटकांची संयुक्त बैठक झाली. यावेळी सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, नगररचनाकार युवराज चव्हाण, कार्यकारी अभियंता राजेश पवार यांच्यासह नगररचना विभागातील अधिकारी व अभियंते उपस्थित होते. उच्च न्यायालय आणि उच्चस्तरीय समितीच्या निर्देशांनुसार शहरातील सर्व बांधकामस्थळांवर प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश या बैठकीत देण्यात आले.



**पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी**

बांधकामासाठी किंवा धूळ नियंत्रणासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याऐवजी बिगर-पिण्याचे किंवा प्रक्रिया केलेले पाणी वापरणे बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन झाल्यास बांधकाम तातडीने थांबवून संबंधित जागा सील करण्यात येईल, असा इशारा आयुक्तांनी दिला आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी प्रत्येक बांधकामस्थळी ३० फूट उंचीचे संरक्षक अडथळे उभारणे, इमारत वरपासून खालपर्यंत हिरव्या जाळीने झाकणे, वाहनांच्या चाकांमुळे रस्त्यावर धूळ पसरणार नाही यासाठी वाहन धुलाईची सुविधा उभारणे आणि नियमित पाणी फवारणी करणे आवश्यक आहे. तसेच हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी सेन्सर्स बसविणे आणि हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाची (एक्यूआय) माहिती दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**बांधकाम परवानगीसाठीही नियमपालन आवश्यक**

प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना पूर्ण केल्याची कागदपत्रे तसेच विकासक आणि वास्तुविशारद यांची हमीपत्रे बांधकाम परवानगी व्यवस्थापन प्रणालीद्वारे (बीपीएमएस) सादर केल्याशिवाय बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिले जाणार नाही. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांना नियमांचे पालन केल्याशिवाय काम सुरू करता येणार नाही. आयुक्त डॉ.शिंदे यांनी सांगितले की, वाढते वायू प्रदूषण ही केवळ कायदेशीर बाब नसून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या आहे. हिवाळ्यात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असलेल्या रुग्णांना प्रदूषणाचा अधिक त्रास होतो. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांनी व्यावसायिक जबाबदारीसोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीही ओळखून नियमांचे पालन करावे. आपणही याच शहरात राहतो आणि हीच हवा श्वासासाठी वापरतो, याचे भान ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

## निफाडच्या नागापूरमध्ये 'पट्टेरी वाघाची' दहशत निघाली बनावट

### 'एआय' च्या सहाय्याने अफवा पसरवणाऱ्या तरुणावर पोलिसांची कारवाई



**अफवा पसरवल्यास कठोर कारवाईचा इशारा !**

नागापूर परिसरात पट्टेरी वाघ आल्याची माहिती पूर्णपणे खोटी आहे. नागरिकांनी अशा कोणत्याही खोट्या मेसेज किंवा फोटोंवर विश्वास ठेवून घाबरून जाऊ नये. सोशल मीडियावर सत्यता न पडताळता अशा पद्धतीचे बनावट फोटो अथवा अफवा पसरवणाऱ्यांवर सायबर कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली जाईल.

**– वनविभाग व पोलीस प्रशासन**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१०, निफाड (नाशिक) :** निफाड तालुक्यातील नागापूर येथे घराच्या परिसरात पट्टेरी वाघ फिरत असल्याचे भासवणारा सीसीटीव्ही फोटो सोशल मीडियावर व्हायरल करून नागरिकांमध्ये घबराट पसरवण्याचा खोडसाळ प्रकार उघडकीस आला आहे. वनविभागाने केलेल्या तांत्रिक तपासणीत हा फोटो आधुनिक 'एआय' तंत्रज्ञानाचा गैरवापर करून तयार केलेला बनावट (Fake) असल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी सायखेडा पोलिसांनी संबंधित तरुणाला ताब्यात घेऊन कडक समज दिली आहे.

**नेमकी घटना काय?**

१० ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीपासून मौजे नागापूर येथील रहिवासी रामदास धोंडीराम टर्ले यांच्या घरासमोर पट्टेरी वाघ आल्याचे भासवणारे सीसीटीव्ही फुटेजचे फोटो व्हॉट्सॲपसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तुफान व्हायरल झाले होते. निफाड तालुक्यात बिबट्याचा वावर नियमित असला, तरी थेट पट्टेरी वाघ दिसल्याची बातमी पसरल्याने परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

**तांत्रिक पडताळणीत फुटले बिंग**

घटनेचे गांभीर्य ओळखून वनविभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळ व व्हायरल फोटोची तांत्रिक पडताळणी सुरू केली. फोटोची बारकाईने तपासणी केली असता, हे फोटो मूळ नसून 'एआय' टूलचा वापर करून तयार केल्याचे उघडकीस आले. नागापूर येथीलच रहिवासी अक्षय रामदास टर्ले या युवकाने खोडसाळपणातून हे बनावट फोटो तयार करून व्हायरल केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

**पोलिसांकडून कडक ताकीद !**

परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करून अफवा पसरवल्याप्रकरणी संशयित अक्षय टर्ले याला सायखेडा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. पोलिसांनी त्याची कानउघाडणी करत भविष्यात असा खोडसाळपणा न करण्याबाबत कडक ताकीद दिली असून, याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाईची नोंद करण्यात आली आहे.

---

## चंद्रपूरच्या औद्योगिक वैभवाला नवी दिशा ! उद्योजकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची मुनगंटीवार यांची ग्वाही

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** ऐतिहासिक वारशाची समृद्ध परंपरा, औद्योगिक विकासाची क्षमता आणि आधुनिक पायाभूत सुविधांची जोड देत चंद्रपूर शहराला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा ध्यास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने जोपासला आहे. याच विकासदृष्टीचा प्रत्यय चांदा इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेटमधील मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ते आणि मुख्य प्रवेशद्वाराच्या बांधकामातून आला आहे. तब्बल ३ कोटी रुपये खर्चून ही कामे पूर्ण झाल्याबद्दल संस्थेच्या संचालक मंडळाने आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.

मात्र, या सन्मानाकडे केवळ एका कामाच्या पूर्ततेनंतरचा गौरव म्हणून न पाहता, चंद्रपूरच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देण्याच्या व्यापक संकल्पाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. शहराचा ऐतिहासिक वारसा जपत आधुनिक सुविधांची उभारणी, शिक्षणाच्या संधींचा विस्तार, आरोग्यसेवेचे बळकटीकरण आणि दळणवळणाच्या सुविधा सक्षम करण्याच्या माध्यमातून चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासाची नवी क्षितिजे अधिक व्यापक करण्याचे प्रयत्न आ. मुनगंटीवार यांनी आपल्या विकासकामांतून पुढे आणले आहेत.

आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चांदा इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेटमधील मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ते आणि मुख्य प्रवेशद्वाराचे काम पूर्ण करण्याची संधी मिळणे, हा माझ्यासाठी आनंदाचा आणि समाधानाचा क्षण आहे. संस्थेच्या संचालक मंडळाने आभार व्यक्त करण्यासाठी निमंत्रित केले, याचा मनस्वी आनंद आहे. आपण सर्वांनी केलेले प्रेमळ स्वागत आणि व्यक्त केलेली आपुलकी ही माझ्यासाठी मोलाची आहे. कारण आयुष्यात शेवटी माणसाच्या सोबत राहते ती त्याने कमावलेली माणसे, त्यांचे प्रेम आणि विश्वास.



एकेकाळी चांदा इंडस्ट्रियल इस्टेट हे चंद्रपूरच्या औद्योगिक वैभवात महत्त्वाची भर घालणारे क्षेत्र होते. मात्र, कालांतराने आवश्यक पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या परिसराच्या विकासाला अपेक्षित गती मिळू शकली नाही. आजही काही कामे पूर्ण होणे बाकी असून, येत्या काही महिन्यांत ती मार्गी लावण्यासाठी माझे प्रयत्न राहतील. या परिसरातील उद्योजकांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, उद्योगांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि चांदा इंडस्ट्रियल इस्टेटने पुन्हा एकदा औद्योगिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निमाण करावी, यासाठी मी ठामपणे प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही आ.मुनगंटीवार यांनी दिली.

चंद्रपूरला केवळ ऐतिहासिक शहर म्हणून नव्हे, तर शिक्षण, आरोग्य, उद्योग, पर्यटन आणि दळणवळणाच्या क्षेत्रांत सक्षम असलेले आधुनिक शहर म्हणून विकसित करण्याची व्यापक भूमिका आहे, असे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले. चांदा इंडस्ट्रियल इस्टेटच्या विकासातून स्थानिक उद्योजकांना दिलासा मिळण्याबरोबरच या परिसरातील औद्योगिक घडामोडींना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. रस्ते आणि प्रवेशद्वारासारख्या मूलभूत सुविधांची उभारणी ही औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची पायरी आहे. त्याचबरोबर उर्वरित पायाभूत सुविधांची पूर्तता, उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण आणि परिसराचा सर्वांगीण विकास या बाबींनाही महत्त्व आहे.

चंद्रपूरच्या ऐतिहासिक वैभवाला आधुनिक विकासाची जोड देणे, औद्योगिक क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे आणि स्थानिक उद्योजकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, हा विकासाचा प्रवास अधिक गतिमान करण्याचा निर्धार आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. यावेळी महापौर संगीता खांडेकर, डॉ. मंगेश गुलवाडे, राहुल पावडे, कल्पना पालिकुंडवार,पद्मकुमार नायर, मनोज सिंघवी, रवी लोणकर, सुनीता जयस्वाल, रुद्रनारायण तिवारी यासह इंडस्ट्रियल इस्टेटचे संचालक मंडळ यावेळी उपस्थित होते.



## महानायकाचा वाढदिवस

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे (हरिवंशराय बच्चन) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही.

अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमनसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या.

उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या.

त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८४ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

# नवरात्रोत्सव : स्त्रीशक्तीचा जागर, कलेचा सन्मान आणि संस्कृतीचा वारसा

भारतीय संस्कृती ही विविध सण-उत्सवांनी समृद्ध झालेली आहे. प्रत्येक सण आपल्याला जीवनमूल्यांची शिकवण देतो. त्यापैकी नवरात्रोत्सव हा भक्ती, शक्ती, कला, संस्कृती आणि सामाजिक प्रबोधन यांचा सुंदर संगम आहे. नऊ दिवस चालणारा हा उत्सव केवळ देवीच्या आराधनेचा सोहळा नसून स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचा प्रेरणादायी उत्सव आहे.

कला शिक्षक आणि चित्रकार म्हणून नवरात्रोत्सवाकडे पाहताना मला या उत्सवातील कलात्मकतेचे विशेष आकर्षण वाटते. देवीच्या मूर्ती, आकर्षक देखावे, मनमोहक रांगोळ्या, फुलांची सजावट, रंगसंगती आणि गरबा-दांडियाचे कलाविष्कार यांतून भारतीय कलेचे वैभव अनुभवायला मिळते. प्रत्येक कलाकृतीमागे कलाकाराची कल्पकता, मेहनत, कौशल्य आणि साधना दडलेली असते. त्यामुळे नवरात्रोत्सव हा धार्मिक श्रद्धेबरोबरच कलाकारांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारा उत्सव आहे.

नवरात्रोत्सवात आदिशक्तीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. या रूपांमधून धैर्य, संयम, मातृत्व, सामर्थ्य आणि सकारात्मकतेचा संदेश मिळतो. आज स्त्रिया शिक्षण, विज्ञान, कला, क्रीडा, उद्योग आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःचे स्थान निर्माण करणाऱ्या प्रत्येक स्त्रीमध्ये मला आदिशक्तीचे दर्शन घडते.



मात्र, स्त्रीशक्तीचा जागर केवळ घोषणांपुरता मर्यादित राहू नये. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता दोघांनाही समान संधी मिळाली पाहिजे. महिलांना सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि सन्मान मिळणे ही समाजाची जबाबदारी आहे. देवीची पूजा करताना प्रत्येक स्त्रीचा आदर करणे, हीच या उत्सवाची खरी शिकवण आहे.

एक कला शिक्षक म्हणून मला वाटते की, प्रत्येक सण हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याची उत्तम संधी असतो. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांकडून देवीची चित्रे, रांगोळ्या, पोस्टर्स, आकर्षक सजावट आणि स्त्रीशक्तीविषयक घोषवाक्ये तयार करून घेता येतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती, रंगज्ञान आणि सौंदर्यदृष्टी विकसित होते.

कलाशिक्षण म्हणजे केवळ चित्र काढणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे होय. उत्सवांच्या माध्यमातून मुलांना भारतीय संस्कृतीची ओळख करून देतानाच पर्यावरणसंवर्धन, स्वच्छता आणि स्त्री-सन्मान यांसारखी मूल्येही शिकवता येतात.

भारताच्या विविध भागांत नवरात्रोत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रातील देवीची आराधना, गुजरातमधील गरबा-दांडिया आणि पश्चिम बंगालमधील दुर्गापूजेचे भव्य देखावे हे भारतीय संस्कृतीच्या विविधतेचे सुंदर दर्शन घडवतात. या परंपरांमधून चित्रकला, शिल्पकला, हस्तकला आणि लोककलेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचतो.

परंपरा जपत असताना पर्यावरणाची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पर्यावरणपूरक मूर्ती, नैसर्गिक सजावट, प्लास्टिकचा मर्यादित वापर आणि ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण यांना प्राधान्य दिले पाहिजे. तसेच नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून स्त्रीशिक्षण, महिला सुरक्षा आणि गरजू व्यक्तींना मदत अशा सामाजिक उपक्रमांनाही चालना मिळाली पाहिजे.

कलेचा सन्मान करताना कलाकारांच्या श्रमांचाही सन्मान झाला पाहिजे. सुंदर मूर्ती, देखावे आणि सजावट निर्माण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कलेचे योग्य मूल्यांकन करणे आणि स्थानिक कलावंतांना संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

माझ्या मते, नवरात्रोत्सवाचा खरा अर्थ केवळ नऊ दिवस देवीची पूजा करण्यात नसून तिच्या सामर्थ्याचा, धैर्याचा आणि करुणेचा आदर्श आपल्या जीवनात उतरवण्यात आहे. स्त्रीशक्तीचा सन्मान, कलेचे संवर्धन, सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांची जोपासना आपण केली, तर हा उत्सव अधिक अर्थपूर्ण ठरेल.

देवीची खरी आराधना मंदिरातील पूजेपुरती मर्यादित नसते; ती प्रत्येक स्त्रीच्या सन्मानात, प्रत्येक कलाकाराच्या कलेत, प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्जनशीलतेत आणि समाजाच्या कल्याणासाठी केलेल्या सत्कर्मात प्रतिबिंबित होते. हाच नवरात्रोत्सवाचा खरा संदेश आहे.

**लेखक : श्रीराम साहेबराव महाजन**
**(कला शिक्षक/चित्रकार/सुलेखनकार)**

# आमच्या कुटुंबाची नवदुर्गा ; आमची आई सुनिता राजाराम सुतार

आई... हा केवळ दोन अक्षरांचा शब्द नाही, तर संपूर्ण आयुष्याचा आधार आहे. शिंक आली, कुठे लागले, थोडे दुखले किंवा मन उदास झाले तरी नकळत तोंडातून पहिला शब्द निघतोआई गं...

माझी आई सुनिता राजाराम सुतार. आमच्या कुटुंबासाठी ती केवळ आई नाही, तर आमच्या संपूर्ण कुटुंबाची नवदुर्गा आहे.१९५५ च्या आसपासचा तो काळ. शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत. आजच्यासारख्या सुविधा नव्हत्या. गॅस नव्हता, टीव्ही नव्हता, मोबाईल नव्हता. मंदिरातील कीर्तन, भजन, सण-उत्सव आणि एकमेकांच्या घरात बसून होणाऱ्या गप्पा एवढेच त्या काळाचे विश्व होते. अशा परिस्थितीत आईने १६-१७ जणांच्या एकत्र कुटुंबात संसार केला. स्वतःचा संसार, मुले, दोन मोठे दीर, त्यांच्या पत्नी-मुले आणि सासूएवढ्या मोठ्या कुटुंबातील प्रत्येकाचा मान राखत, सगळ्यांना सोबत घेऊन तिने संसाराचा गाडा पुढे नेला.

ऋतूनुसार मसाले करणे, पापड करणे, घरातील कामे करणे, एकमेकींना मदत करणे आणि सगळ्यांनी एकत्र बसून सुख-दुःखाच्या गप्पा मारणे, हाच त्या काळाचा संसार होता. आईचा स्वभाव शांत, समंजस आणि वाद टाळणारा. मुलांवर राग आला, कधी ओरडली, एखाद्या वेळी शिक्षा केली तरी त्या रागामागेही प्रेमच होते. आईने आम्हाला फक्त वाढवले नाही, तर आम्हाला घडवले.

संसारात अनेक चढ-उतार आले. पतीचे निधन हा तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा आघात होता. आयुष्याचा आधारच निघून गेल्यानंतरही आई खचली नाही. स्वतःचे दुःख मनात ठेवून मुलांसाठी जगत राहिली आणि संपूर्ण कुटुंबाला एकत्र बांधून ठेवले.

आज मात्र कमरेतील फ्रॅक्चरमुळे आई बेडवर आहे. आयुष्यभर घरासाठी धावणारी आई आज एका जागी बसून राहते. मनात अनेक विचार आणि इच्छा आहेत; पण परिस्थितीसमोर तिला सगळे मुकाट्याने सहन करावे लागते. कधी तिच्याकडे पाहताना मनात एकच विचार येतोजिने आयुष्यभर आमच्यासाठी धाव घेतली, तिच्यासाठी आता आपण किती धावू शकतो?



जिने आमचे हात धरून आम्हाला चालायला शिकवले, आज तिचा हात धरून तिला आधार देण्याची वेळ आमची आहे. जिने आमचे अश्रू पुसले, आज तिच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची वेळ आमची आहे. आई-वडिलांनी दिलेले संस्कार आयुष्यभर सोबत राहतात. आईने आमच्या मनात प्रेम, माणुसकी, कुटुंबाला एकत्र ठेवण्याची भावना आणि मोठ्यांचा मान राखण्याचे संस्कार पेरले. आज आम्ही जे काही आहोत, त्यात तिच्या संस्कारांचा मोठा वाटा आहे. पेरले तेच उगवते, याची जाणीव आज आम्हाला होते.

नवरात्रीच्या या पवित्र दिवसांत नवदुर्गेची आठवण झाली की आमच्या डोळ्यांसमोर आई उभी राहते. तिने नऊ रूपे धारण केली नसतील, पण आयुष्यभर असंख्य रूपांत आमच्यासाठी जगली आहेकधी मायेची सावली, कधी धैर्य देणारी शक्ती, कधी चूक सुधारणारी गुरू, तर कधी संपूर्ण कुटुंबाला पदराखाली घेणारी माऊली.म्हणून माझी आई सुनिता राजाराम सुतार ही केवळ माझी आई नाही; ती आमच्या संपूर्ण कुटुंबाची शक्ती, आमच्या संस्कारांची जननी आणि आमची खरी नवदुर्गा आहे.आणि हा लेख केवळ माझ्या आईपुरता नाही. आपल्या प्रत्येक घरात अशी एक आई असते, जी स्वतःचे दुःख लपवून मुलांच्या चेहऱ्यावर हसू आणते, स्वतःची स्वप्ने बाजूला ठेवून मुलांची स्वप्ने पूर्ण करते आणि आयुष्यभर आपल्या लेकरांसाठी जगते.

म्हणून नवरात्रीच्या या पवित्र पर्वावर हा लेख माझ्या आईला आणि जगातील प्रत्येक त्या माऊलीला समर्पित आहे, जिने आपल्या लेकरांसाठी स्वतःला विसरून आयुष्य जगले. प्रत्येक आई हीच नवदुर्गा आहे.आईच्या मायेची सावली डोक्यावर असणे, हीच आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती आहे.

**– चंद्रकांत सुतार**
**माथेरान**

## पहिली माळ

नऊ रुपे नऊ दिवस
दुर्गा सजली नवरात्री
पहिले रूप आगळेचं
पहिलीमाळ शैलपुत्री

वृषभारूढ महामाया
करारीपणा दिसे नेत्री
धवल रंग प्रिय तिला
वहावी फुले बेल पत्री

शरणागता आधार दे
भक्तावरती कृपाछत्री
विविध रुपात जागृती
साक्षात्कार भिन्न क्षेत्री

साहिलाअपमान खूप
असे तरी आनंददात्री
शिव शंभो वश करशी
वर तू मनोमनी चित्री

हातात त्रिशूळ शोभते
विजयाची देई खात्री
कमळ पुष्प दुजे करी
निर्मळता सफल गात्री

आपत्ती टळो सर्वाप्रती
सुखे न्हावो ही धरित्री
आई तुजला शरणागत
जग हे राहो एक सुत्री

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# जयसिंगपूर येथील ऊस परिषदेत राजू शेट्टी काय भूमिका घेणारं ?



शनिवार १० ऑक्टोंबर रोजी दु. २ वा. जयसिंगपूर येथील विक्रमसिंह मैदानावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मा.खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली रौप्यमहोत्सवी अर्थात २५ वी. ऊस परिषद होणारं आहे. या ऊस परिषदेकडे संपूर्ण महाराष्ट्रसह बेळगांव जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील ऊस उत्पादक शेतकरी व साखर सम्राटांचे लक्ष लागून राहिले आहे.

या ऊस परिषदेत राजू शेट्टी कोणती भूमिका जाहीर करतात, मागील हंगामातील अंतिम बिल, तसेच यंदाच्या गळीत हंगामातील ऊसाला पहिला ॲडव्हान्स किती रुपयांचा असावा याबाबत शेट्टी यांच्या भूमिकेबाबत उत्सुकता लागली आहे सद्या महाराष्ट्रसह कर्नाटकातील साखर उद्योजकांनी योग्य टायमिंग साधून आपल्या साखर कारखान्यांचा बॉयलर प्रदिपण सोहळा आटोपला आहे. दरम्यान राजू शेट्टी यांनी ऊस परिषदेच्या पार्श्वभूमीवर गावोगावी सभा, मेळावे घेऊन ऊस दरांबाबत जनजागृती केली आहे. यंदा भिषण दुष्काळ स्थिती, उत्पादन खर्चात सातत्याने होत असलेली वाढ, खते, औषधे, बियांने, मशागतींचा खर्च, यासोबत ऊस तोडणी आणि वाहतूक खर्च वाढल्याने ऊस शेतीचा आर्थिक ताळेबंद बिघडला आहे. उसाची एफआरपी वाढत असली तरी तोडणी वाहतूक खर्चामुळे शेतकऱ्यांना फटका बसतो आहे. ऊस वजन करताना होणारी कथित काटामारी, रिकव्हरीमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांच्या तक्रारी तसेच ऊस तोडणीसाठी अतिरिक्त पैशाची मागणी या प्रश्नावरही त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

साखरेचा हमीभाव ५० रुपये करावा, सी - हेवी मोलॅसिसपासून तयार होणाऱ्या इथेनॉलला प्रतिलिटर ७० रुपये दर द्यावा ऊस उत्पादनाचा वाढता खर्च आणि बाजारातील बदलती परिस्थिती लक्षात घेता यंदाच्या हंगामात ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा अशी मागणी माजी खासदार राजू शेट्टींनीं केली आहे. त्यामुळे संपूर्ण साखर उद्योगासह ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे या ऊस परिषदेकडे लक्ष लागले आहे.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# विज्ञान नाट्य महोत्सवात पीएमश्री कन्या शाळेची दमदार कामगिरी

## जिल्हास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत पालमच्या शिरपेचात मानाचा तुरा



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१०, पालम (परभणी) :** जिल्हा परिषद, परभणी यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सव स्पर्धेत पालम येथील पीएमशी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेने तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी विज्ञानविषयक संकल्पना नाट्याच्या प्रभावी माध्यमातून सादर करून वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि अभिनयकौशल्याचा उत्कृष्ट संगम घडवून आणला.

विज्ञान विषयातील क्लिष्ट संकल्पना सोप्या, रंजक आणि परिणामकारक पद्धतीने विद्यार्थ्यांनी नाट्यरूपातून मांडल्या. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाला स्पर्धेत दाद मिळाली आणि शाळेने जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळवत पालमचे नाव उज्ज्वल केले. विद्यार्थ्यांच्या या यशातून अभ्यासासोबतच कला, विज्ञान आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणाऱ्या शाळेच्या उपक्रमांचे फलित अधोरेखित झाले आहे. हे यश मुख्याध्यापक सतीश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली विज्ञान शिक्षिका बाबर , सोनी शेख , ज्ञानोबा पातळे, पाचांळ सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनातून साकारले. विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, केलेला सराव आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सहभागी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक आणि संपूर्ण शाळा परिवाराचे पालक, शिक्षणप्रेमी व नागरिकांकडून अभिनंदन होत आहे. जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य महोत्सवातील या यशामुळे पीएमशी कन्या शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

# 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत खारघरमध्ये महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, पनवेल (नवी मुंबई)** : महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते प्रभाग ब खारघर अंतर्गत प्रभाग समिती कार्यालयात आज दिनांक १० ऑक्टोबर रोजी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महापौर नितीन पाटील, बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे, प्रभाग समिती सभापती ब चे सभागपती मधु पाटील, नगरसेविका उषा अजित अडसूळ, नगरसेवक समीर कदम उपस्थित होते

यावेळी महापौर नितीन पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी आरोग्य शिबीराविषयी माहिती दिली.

या शिबिरांमध्ये महिलांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले.या शिबिरांमध्ये सांधेदुखी, गुडघेदुखी, हात-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले. तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग (ढइ) तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी अशा विविध आरोग्य सेवा व तपासणी सेवा देण्यात आल्या. यावेळी सुमारे २२५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी डॉ उषा राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ सुरेश पंडित, वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी भागातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

गेल्या चार दिवसांपासून महापालिकेच्या वतीने सेवा संकल्प अभियान अंतर्गत चारही प्रभागातील आयोजित महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिरांस महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे महिलांच्या रोजच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या आरोग्य तक्रारींचे निवारण व स्तन, गर्भाशय मुख कर्करोग तपासणी या आरोग्य शिबिरांमध्ये आयोजित केल्या मुळे महिलांनी महापालिकेचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्य न्यू इंग्लिश स्कूल अंदोरी विद्यालयाची यशस्वी वाटचाल



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.०९, खंडाळा (सातारा) :** तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये पुढील प्रमाणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये इंग्लिश स्कूल अंदोरी विद्यालयाच्या खेळाडूनी खेळामध्ये भाग घेऊन उत्कृष्ट खेळ करून तालुकामध्ये विविध स्पर्धेमध्ये क्रमांक पटकावले ते पुढीलप्रमाणे :- सांघिक खेळकबड्डी १७ वर्षाखालील मुली तालुक्यामध्ये द्वितीय क्रमांकखो खो १९ वर्षाखालील मुले तालुक्यामध्ये द्वितीय क्रमांककबड्डी मुले १७ वर्षाखाली तालुक्यामध्ये तृतीय क्रमांकवैयक्तिक खेळ

१. ४०० मीटर धावणे कुमारी समीक्षा नितीन होळकर,, तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक, जिल्हा पातळीवर निवड

२. लांब उडी कुमारी अमृता बाळा साहेब जानकर, तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक, जिल्हा पातळीवर निवड

३. गोळा फेक कुमार आयुष भाऊसाहेब खुंटे, तालुक्यामध्ये प्रथम, जिल्हा पातळीवर निवड

४. कुस्ती कुमारी सेजल नवनाथ धायगुडे, तालुक्यामध्ये प्रथम, जिल्हा पातळीवर निवड

५. कुस्ती कुमार विवेक अंकुश कराडे, तालुक्यामध्ये प्रथम जिल्हा पातळीवर निवड, सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे सचिव सन्माननीय अनिरुद्ध गाढवे, सर्व संचालक, विद्यालयाचे प्राचार्य राजधानी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य खंडाळा तालुका अध्यक्ष सुहास महांगरे सन्माननीय रिटे सर, विद्यालयातील सर्व शिक्षक, लेखनिक,प्रशिक्षक, आंदोरी पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबईत आफ्रिकन ड्रग्ज तस्करावर कारवाई; तळोज्यातून 3.५७ कोटींचे कोकेन-मेफेड्रॉन जप्त

## आफ्रिकन नागरिकाला अटक; घरझडतीत कोकेनचा मोठा साठा आढळल्याची माहिती

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१०, पनवेल (नवी मुंबई) :** तळोजा परिसरात अमली पदार्थांच्या तस्करी विरोधात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला असून, तळोजा येथील कारवाईत कोकेन आणि मेफेड्रॉन असा एकूण ३.५७ कोटी रुपयांचा अमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी एका आफ्रिकन नागरिकाला अटक करण्यात आली असून, त्याच्या घराची झडती घेतली असता कोकेनचा मोठा साठा आढळल्याचे सांगण्यात येत आहे. या कारवाईमुळे नवी मुंबई परिसरातील अमली पदार्थांच्या तस्करीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे आणि संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम तीव्र करण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत संशयित व्यक्ती, अमली पदार्थांच्या विक्रीची ठिकाणे आणि तस्करीशी




संबंधित संभाव्य नेटवर्कवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.तळोजा परिसरात करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान पोलिसांनी संशयित आफ्रिकन नागरिकाला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या निवासस्थानी झडती घेण्यात आली.

या झडतीत कोकेनचा मोठा साठा आढळल्याची माहिती आहे. कारवाईत कोकेन आणि मेफेड्रॉन या अमली पदार्थांची एकूण किंमत ३.५७ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र, जप्त करण्यात आलेल्या दोन्ही पदार्थांचे स्वतंत्र प्रमाण, अटकेतील व्यक्तीची ओळख आणि अमली पदार्थांच्या पुरवठ्याच्या साखळीबाबतची सविस्तर माहिती अधिकृत पोलीस निवेदनातून स्पष्ट होणे आवश्यक आहे.अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी पोलिसांकडून संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासह संबंधित प्रकरणांचा तपास केला जात आहे. जप्त केलेले अमली पदार्थ कुठून आणण्यात आले, त्यांची विक्री कोणाला केली जाणार होती आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

अटकेतील आरोपीच्या चौकशीतून तस्करीच्या नेटवर्कबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.दरम्यान, तरुणांमध्ये अमली पदार्थांचा वाढता प्रसार रोखणे, अवैध विक्रीवर नियंत्रण मिळवणे आणि तस्करीच्या साखळीचा छडा लावणे ही पोलिसांसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत. नवी मुंबई आणि तळोजा परिसरात सुरू असलेल्या कारवायांमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात सहभागी असणाऱ्यांवर कारवाईचा दबाव वाढला आहे.

# खासदारकी पेक्षा जनसेवा मोठी; जिल्हा बँकेत पदासाठी नव्हे, लोकांसाठी

## घराण्याच्या परंपरेशी तडजोड नाही; सहकारात राजकारण घुसल्यास सामान्यांचे नुकसान! उदयनराजेंचा स्पष्ट संदेश

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, सातारा :** सत्ता आणि पदांपेक्षा जनतेशी असलेली बांधिलकी महत्त्वाची! जिल्हा बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर खासदार उदयनराजे भोसले यांनी आपल्या भाषणातून हाच संदेश दिला. 'मी पदासाठी हपापलेले नाही. खासदारकीचा राजीनामा ही दिला होता. त्यापेक्षा जिल्हा बँकेचे पद मोठे नाही. या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करता येते, हीच माझी भूमिका



आहे,' असे सांगत त्यांनी पदाच्या राजकारणापेक्षा जनहिताला प्राधान्य दिले. उदयनराजे भोसले मित्रमंडळाच्या वतीने हॉटेल लेक व्ह्यू येथे त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्यांनी घराण्याची परंपरा, सहकार चळवळीचा मूळ उद्देश आणि सर्वसामान्यांच्या विकासाबाबत आपली भूमिका मांडली. यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती सुनील काटकर, काका धुमाळ, संग्राम बर्गे, डी.के. पवार, रामभाऊ लाहोटी, संतोष कणसे, बाळासाहेब ननावरे, अशोक मोने, यशवंत ढाणे, उदयसिंह जगदाळे, धनाजी साळुंखे आदी उपस्थित होते.

# २८ जनावरांची सुटका; आयशर ट्रकसह २१.९3 लाखांचा मुद्देमाल जप्त

## गोवंश तस्करीवर पोलिसांची धडक कारवाई




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** जिल्ह्यात गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात पडोली पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलिसांच्या नाकाबंदीला न जुमानता भरधाव वेगाने वाहन पळविणाऱ्या चालकाचा पोलिसांनी पाठलाग केला. अखेर वरोडा गावाजवळ रस्त्यावर अडथळा निर्माण करून आयशर वाहन थांबविण्यात पोलिसांना यश आले. वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये अमानुषपणे कोंबून ठेवलेली २८ गोवंशीय जनावरे आढळून आली. या कारवाईत जनावरांसह आयशर वाहन आणि मोबाईल फोन असा एकूण २१ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, वाहनचालकाला अटक करण्यात आली आहे.

पडोली पोलीस ठाण्याचे पथक पडोली चौकासमोर नाकाबंदी करीत असताना, पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे लाल रंगाचे आणि निळ्या ताडपत्रीने झाकलेले सहाचाकी आयशर वाहन (क्रमांक एमएच-२८-बीबी-४९७०), चंद्रपूरकडून इरई नदी मार्गाने येताना दिसले.

पोलिसांनी वाहनचालकाला थांबण्याचा इशारा करून वाहन रस्त्याच्या बाजूला घेण्यास सांगितले. मात्र,चालकाने वाहन पेट्रोल पंपाच्या आवारात वळवून यू-टर्न घेतला आणि रॉंग साईडने अतिवेगाने पळ काढला. त्यामुळे पोलिसांनी तातडीने वाहनाचा पाठलाग सुरू केला.पोलिसांच्या पाठलाग दरम्यान आयशर वाहन कोसारा फाटा चौकातून देवाडा मार्गे वेंडली आणि पुढे राजुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरोडा गावाच्या दिशेने जात होते. पोलिसांनी ही पाठलाग सुरू ठेवत वरोडा गावातील रस्त्यावर अडथळा निर्माण करून वाहन थांबविले.

वाहन थांबताच चालकाने वाहन जागेवर सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क पोलीस पथकाने त्याचा पाठलाग केला आणि गावालगतच्या शेतशिवारातून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये बैल आणि गायी अशी एकूण २८ गोवंशीय जनावरे अमानुषपणे कोंबून भरलेली आढळली.

मुद्देमालामध्ये २८ जिवंत गोवंशीय जनावरे असून अंदाजे किंमत १ लाख ८३ हजार रुपये, तसेच आयशर वाहन क्रमांक (एमएच-२८-बीबी-४९७०) अंदाजे २० लाख रुपये आणि विवो कंपनीचा मोबाईल फोन किंमत अंदाजे १० हजार रुपये असा एकूण २१ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या प्रकरणी अब्दुल हफिज गुफ्रान खान (वय ३३ वर्षे, रा.वार्ड क्र.४, कुरेशी मोहल्ला, गडचांदूर), याला अटक करण्यात आली आहे.

आरोपीविरुद्ध पडोली पोलीस ठाण्यात अप.क्र.३१६/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित २०१५) मधील कलम ५(१), ५(ब), ९ व ११, प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११(१)(ड), तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १३२,१७९ व १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाईजिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि चंद्रपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक सुधाकर कोकोडे, पोलीस हवालदार विनोद वानकर, धीरजकुमार लोधी, पोलीस अंमलदार समीर खाडे, श्रीनिवास वाभीटकर आणि धीरज भोयर यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या कारवाईमुळे गोवंशीय जनावरांच्या अवैध वाहतुकीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ४० लाखांचा १६ चाकी ट्रक अन् १० ब्रॉस रेती जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात अवैध रेती वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत तब्बल ४० लाख रुपये किमतीचा १६ चाकी ट्रक आणि १० ब्रास रेतीसह एकूण ४० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या पथकाला रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने



नाकाबंदी करून कारवाई केली. यावेळी महिंद्रा कंपनीचा १६ चाकी ट्रक क्रमांक एमएच- ४० सीव्ही- ९३३३ आणि त्यातील १० ब्रास रेती जप्त करण्यात आली. या प्रकरणात ट्रकचालक नविनकुमार महाबीर सिंग (वय ४०, रा. फुलूटोला तफरदे, ता. पुरैनी बाजार, जि. मधेपुरा, बिहार) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तर ट्रकचा मालक वाहिद झबीर शेख (रा. उमरेड, जि. नागपूर) हा पाहिजे आरोपी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या कारवाईत पोलिसांनी पुढील मुद्देमाल जप्त केला असून त्यात १६ चाकी महिंद्रा ट्रक ₹४०,००,०००, १० ब्रास रेती ₹६०,०००, जुना वापरता मोबाईल ₹१०,००० रुपये असा एकूण जप्त मुद्देमाल ₹४०,७०,००० रुपयांचा आहे. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अप. क्र. ११७३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), जमीन महसूल कायदा कलम ४८(७), ४८(८) तसेच मोटार वाहन कायदा कलम १७७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या उपविभाग राजुरा पथकाने केली. जिल्ह्यातील अवैध रेती वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी अशा कारवायांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

# वडवलीत शेतकऱ्यांना आधुनिक शेती साहित्याचे वाटप

## आमदार कॉ.निकोले यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम; पावर विडर, मळणीयंत्र आणि ठिबक सिंचन साहित्याचे वितरण

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१०, डहाणू (पालघर) :** शेतीच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे श्रम, वेळ आणि खर्च कमी करण्याच्या उद्देशाने तलासरी तालुक्यातील वडवली गावात पाणलोट समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती साहित्याचे वाटप करण्यात आले. डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ.विनोद निकोले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी पावर विडर, मळणीयंत्र तसेच ठिबक सिंचनासाठी आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.

शेतीमध्ये आधुनिक यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतीची कामे अधिक सुलभ होण्यासोबतच उत्पादन प्रक्रियेलाही गती मिळू शकते. ही बाब लक्षात घेऊन पाणलोट समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपयुक्त शेती साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. पावर विडरमुळे पिकांमधील तण नियंत्रण आणि आंतरमशागतीची कामे सुलभ होण्यास मदत होणार आहे. मळणीयंत्रामुळे काढणीनंतरच्या मळणीच्या कामासाठी लागणारा वेळ आणि श्रम कमी होण्याची अपेक्षा आहे. तसेच ठिबक सिंचन साहित्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करून पिकांना आवश्यकतेनुसार पाणी देणे शक्य होणार आहे.

ग्रामीण आणि आदिवासीबहुल भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची साधने उपलब्ध करून देणे, शेतीची उत्पादकता वाढविण्यास प्रोत्साहन देणे आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करणे, या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. शेतीच्या कामांसाठी वाढता खर्च आणि मजुरांची उपलब्धता यांसारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्री उपयुक्त



ठरू शकते. पाणलोट समितीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे वडवली गावातील लाभार्थी शेतकऱ्यांना शेतीची कामे अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी मदत होणार आहे. आधुनिक शेती साहित्याचा योग्य वापर करून शेती अधिक किफायतशीर करण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली आहे.

या कार्यक्रमावेळी तलासरी पंचायत समितीचे माजी सभापती कॉ. नंदू हाडळ, वडवली युनिटचे सचिव कॉ. अजित खुलात, कॉ.लखमा धोधडे, ग्रामपंचायत सदस्य कॉ. दीपक हाडळ, वडवली येथील पेसा सदस्य कॉ. शोभना बेंदर यांच्यासह लाभार्थी शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणलोट समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती साहित्य उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे स्थानिक स्तरावर महत्त्व असून, त्यातून वडवली पसरातील शेतीच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

# थोडक्यात बातम्या

## महानिर्मितीचे विलास मोटघरे यांचे औष्णिक परिषदेत मार्गदर्शन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्यच्या मार्गदर्शनाखाली आणि औद्योगिक सहकार्याने औष्णिक केंद्र व बाष्पक उद्योगाशी संबंधित भव्य राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र आणि परिषदेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले होते. महानिर्मिती स्थापत्य – २ कोराडीचे मुख्य अभियंता तथा महानिर्मितीचे नवनियुक्त प्रभारी कार्यकारी संचालक विलास मोटघरे यांनी या चर्चासत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. या चर्चासत्रात प्रामुख्याने औष्णिक विद्युत केंद्रांमधील सुरक्षितता, ऊर्जा कार्यक्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञान यावर विस्तृत चर्चा केली.

औष्णिक विद्युत निर्मिती क्षेत्रातील त्यांच्या दांडग्या अनुभवामुळे, या परिषदेतील 'औष्णिक वीज केंद्रांमधील आधुनिकीकरण आणि बाष्पक सुरक्षा' या सत्रात त्यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे मानले गेले.

वीज निर्मिती केंद्रांची कार्यक्षमता वाढवणे, उत्पादन खर्च कमी करणे, इंधनाची बचत करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरणपूरक वीज निर्मिती करणे यावर त्यांनी या चर्चासत्रात आपले तांत्रिक विचार मांडले. विलास मोटघरे यांनी महानिर्मितीच्या महाराष्ट्रातील प्रमुख औष्णिक विद्युत केंद्रांचे (जसे की कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, पारस) व्यवस्थापन आणि संचालन यशस्वीरीत्या सांभाळले आहे. बाष्पके संचालनालय आणि महानिर्मिती या दोन्ही शासकीय संस्थांमध्ये औष्णिक केंद्रांच्या सुरक्षेबाबत योग्य समन्वय राखण्यात त्यांची ही उपस्थिती अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. साहेबांच्या मार्गदर्शनाने सर्व महानिर्मिती कर्मचारी व अभियंते आनंदी झाले.

# बल्लारपूर तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांकडून पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी

## आष्टी रिठ व पळसगाव येथील बाधित शेतकऱ्यांशी संवाद



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेती पिकांच्या नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दि.०९ ऑक्टोबर २०२६ रोजी बल्लारपूर तालुक्यातील आष्टी रिठ व पळसगाव या गावांना भेट दिली.

यावेळी त्यांनी भात व कापूस पिकांच्या नुकसानीची शेतात जाऊन पाहणी केली. तसेच बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पिकांच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मुल्यांकन करण्यासाठी तालुक्यातील एकूण पेरणी क्षेत्राच्या २० टक्के क्षेत्राचे ग्राऊंड टूथिंग (प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी) तातडीने पूर्ण करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिले.

बल्लारपूर तालुक्यात पावसाच्या खंडामुळे भात आणि कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी पंत यांनी आष्टी रिठ व पळसगाव येथील विजय बालाजी भोयर, रामदास भोयर, मुकुंदा मडावी व मारुती मडावी यांच्या शेतातील पिकांची पाहणी करुन संवाद साधला. पावसाअभावी पिकांवर झालेला परिणाम, उत्पादनात होणारी संभाव्य घट, शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच झालेल्या नुकसानीबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे अचूक व वस्तुनिष्ठ मुल्यांकन होणे आवश्यक असून, त्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणीची प्रक्रिया गतीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**ग्राऊंड टुथिंगच्या कामात विलंब नको :-** दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने महसूल, कृषी व जिल्हा परिषद या तिन्ही यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. बल्लारपूर तालुक्यातील एकूण पेरणी क्षेत्राच्या २० टक्के क्षेत्राची प्रत्यक्ष पडताळणी करुन पिकांच्या नुकसानीचा अहवाल विनाविलंब सादर करावा. या अहवालाच्या आधारे शासनाकडे आवश्यक प्रस्ताव तातडीने पाठविणे शक्य होणार असल्याने ग्राऊंड टूथिंगच्या कामाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी पंत यांनी दिले. या पाहणी दौऱ्यात बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जून पावरा, तहसीलदार रेणूका कोकाटे, गटविकास अधिकारी धनंजय साळवे, तालुका कृषी अधिकारी आकाश पवार, ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विलास कुमरे, पळसगावच्या सरपंच संगिता सोयाम, वासुदेव मडावी यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

**केशर आंबा फळबाग लागवड क्षेत्राला भेट :-**

विकसित भारत ग्रामीण रोजगार आणि आजीविका हमी योजना (व्हीबीजी-राम-जी) व जिल्हा खनिज निधी अभिसरण अंतर्गत ग्रामपंचायत कोर्टीमक्ता येथील केशर आंबा फळबाग लागवड करण्यात आलेल्या क्षेत्राला जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी भेट दिली.

## महाराष्ट्र विद्यालयाचा कुशल आवळे राज्य स्पर्धेकरिता पात्र



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१० नागपूर :** जिल्हा क्रीडा संकुल भंडारा येथे संपन्न झालेल्या शालेय नागपूर विभागीय कुस्ती स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील कुस्तीगीर कुशल आवळे याने उल्लेखनीय कामगिरी करून १९ वर्ष वयोगटात ७४ किलो खाली वजन गटात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले. यापुर्वी ही कुशल आवळे याने ज्युदो व रस्सीखेच राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केले. मागील वर्षी शालेय रस्सीखेच स्पर्धा नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कुशलने सुवर्णपदक प्राप्त केले. सोबतच सत्र २०२३-२४ शालेय ज्युदो स्पर्धा अमरावती येथे त्यांनी आपल्या वजन गटात रौप्य पदक प्राप्त केले. कुशल अहिल्यानगर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सहभागी होणार असून कुशल यास क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक व विश्वस्त सुनील केदार,अध्यक्ष सुधीर केदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे ,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी वेटलिफ्टरचे अभिनंदन केले.

## सोयगावात जीवामहाले जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०९, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सोयगाव येथील बसस्थानकासमोरील आशीर्वाद जेंट्स पार्लर येथे वीर जीवामहाले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष कैलास काळे यांच्या हस्ते वीर जीवामहाले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी जयघोष करीत वीर जीवामहाले यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

यावेळी सुनील गावांडे, मंगेश सोहनी, संजय मोरे, संतोष बोडखे, मयूर मनगटे दत्तू रोकडे, भगवान कोथळकर, अमोल निकम, आप्पा पंडित, ललित पंडित, देवेंद्र पंडित, भगवान पंडित, ईश्वर सैदाणे, पंकज जाधव, अनिस पठाण, संदीप सोहनी, गोपाल चौधरी, अमोल नेरपगारे यांच्यासह पत्रकार राजू दुतोंडे, ईश्वर इंगळे व विजय काळे उपस्थित होते.

# शिक्षणासाठी राबणाऱ्या जन्मदात्या बापावर पोटच्या मुलांचा जीवघेणा हल्ला

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** जन्मदात्या बापाचा निर्घृण खून केल्याची घटना दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील बाबूळखेडा चिचोली येथे घडली. याप्रकरणाची शाही वाळत नाही तेच मुलांच्या उज्वल भविष्यासाठी दिवस-रात्र एक करणाऱ्या एका जन्मदात्या बापाला केवळ एका दुचाकीच्या क्षुल्लक कारणावरून पोटच्या मुलांनीच रक्ताच्या थारोळ्यात लोळवल्याची संतापजनक घटना खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील लोणखैरी येथे दिनांक ०९ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

काठ्या, विटा आणि चामड्याच्या बेल्टने केलेल्या अमानुष मारहाणीत वडील गंभीर जखमी झाले असून, दोन्ही मुलांना खापरखेडा पोलिसानी बेड्या ठोकल्या आहे.

अर्जुन वासुदेव धुर्वे (२१) व करण वासुदेव धुर्वे (१९) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपी मुलांची नावे आहे तर वासुदेव धुर्वे (५०) हे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या वडिलांचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार शुक्रवारला रात्री ९ वाजताच्या सुमारास वासुदेव धुर्वे हे दिवसभराचे काम आटोपून घरी परतले होते. घरी येताच आरोपी अर्जुन व करण या दोन्ही मुलांनी दुचाकी कुठे ठेवली? असा जाब विचारत वडील वासुदेव धुर्वे यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. यावेळी वासुदेव धुर्वे यांनी मी दिवसरात्र तुमच्या शिक्षणासाठी राब राब राबतो एवढा खर्च करतो व तुम्ही मला दुचाकी बद्दल विचारता? असे म्हटले.

यावेळी वडिलांचे उत्तर एकूण आरोपी अर्जुन व करण यांनी वासुदेव धुर्वे यांना रागाच्या लाकडी काठी, विटांचे तुकडे व कमरेचा बेल्ट काढून जबर मारहाण केली वासुदेव धुर्वे यांच्या डोक्यावर, मानेवर व शरीरावर गंभीर घाव लागल्यामूळे रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. याप्रसंगी वासुदेव धुर्वे यांचा किंचाळण्याचा आवाज ऐकून शेजारी धावून आले. रक्तबंबाळ अवस्थेत वासुदेव धुर्वे यांना मेडिकल ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात केले. वासुदेव धुर्वे यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

घटनेची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही मुलांना ताब्यात घेतले. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १०९(१) आणि ३(५) अंतर्गत खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवून अर्जुन व करण या दोघा भावांना अटक केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल पाटील करत आहेत.

# पुलाजवळ रक्ताच्या थारोळ्यात तरुणाचा मृतदेह ; संतप्त ग्रामस्थांचे सुपा पोलीस ठाण्यात आंदोलन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर - सुपा औद्योगिक वसाहतीत रात्रपाळी करून दुचाकीवरून घरी परतणाऱ्या २७ वर्षीय तरुणाचा मृतदेह दिनांक ०९ ऑक्टोबर रोजी सकाळी रुई छत्रपती-पिंपरी गवळी रस्त्यावरील पुलाजवळ रक्ताच्या थारोळ्यात आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मयूर थोरात (वय २७, रा. पिंपरी गवळी, ता.पारनेर) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याच्या शरीरावर गंभीर जखमा आढळल्याने घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी सुपा पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करत आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांना अटक करण्याची मागणी केली.

**धारदार हत्याराने वार केल्याचा संशय**

मयूर थोरात हा सुपा औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत कामाला होता. गुरुवारी रात्रीची पाळी संपवून तो दुचाकीवरून घरी परतत असताना त्याच्यावर हल्ला झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शुक्रवारी सकाळी रुई छत्रपती-पिंपरी गवळी रस्त्यावरील पुलाजवळ त्याचा मृतदेह आढळून आला.

मयूरच्या पाठीवर, पोटावर, डोक्यावर आणि चेहऱ्यावर गंभीर जखमा



असल्याची माहिती समोर आली आहे. धारदार हत्याराने वार करून तसेच लाकडी दांडक्याने मारहाण करून त्याची हत्या करण्यात आली असावी, असा संशय व्यक्त होत आहे. मात्र, या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांच्या तपासातूनच या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येणार आहे.

**६ महिन्यांपूर्वीच झाला होता विवाह**

मयूर थोरात याचा अवघ्या सहा महिन्यांपूर्वी विवाह झाला होता. नव्या संसाराची सुरुवात केलेल्या तरुणाचा अशा प्रकारे मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मयूरच्या मृत्यूची बातमी समजताच नातेवाईक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेमुळे पिंपरी गवळी गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

**ग्रामस्थांचे सुपा पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन**

मयूरच्या मृत्यूमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी सुपा पोलीस ठाण्यात ठिय्या देत आपल्या भावना व्यक्त केल्या. अज्ञात आरोपींविरोधात तातडीने खुनाचा गुन्हा दाखल करावा, घटनेचा सखोल तपास करावा आणि दोषींना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

या घटनेमागे वैयक्तिक वाद, पूर्ववैमनस्य किंवा अन्य कोणते कारण आहे, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे मयूरच्या मृत्यूचे गूढ उकलण्याचे आव्हान सुपा पोलिसांसमोर आहे. हल्ला नेमका कोणी आणि कोणत्या कारणातून केला, घटनेच्या वेळी काय घडले आणि त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, या प्रश्नांची उत्तरे पोलीस तपासातून मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

तरुणाच्या संशयास्पद मृत्यूमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणातील आरोपींचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.